MHBU060007522026

कि.फौ.अर्ज क्र. ७१/२०२६
परमेश्वर सोनाजी विरशीद -वि- सरकार

**निशाणी क्र. १ वरील आदेश**

प्रस्तुत अर्ज व पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन खामगाव ग्रामीण यांनी सादर केलेला अहवाल पाहिला. अर्जदाराने पटलावर, वाहनाच्या पर्टीकुलरची प्रत, वाहनाच्या इन्श्युरन्सची प्रत सादर केली आहे. या कागदपत्राच्या अवलोकनार्थ अर्जदार हा जप्त बजाज कंपनीची पल्सर २२० डी.टी.एस. वाहन ज्याचा नोंदणी क्र. एम.एच २८ सी.ई. ९३७३ चेचीस नं. MD2A13EX7TCL75650 इंजीन क्रमांक DKXCTL28730 चा तो योग्य मागणीदार वाटतो.

२) खामगाव ग्रामीण पोलीस ठाणे यांनी सदर वाहन आरोपीच्या ताब्यातुन अनैतीक व्यापार प्रतिबंधक कायद्याचे कलम ३, ४ व ५ मध्ये जप्त केले असुन सदरचे वाहन अर्जदारास सुपूर्तनाम्यावर परत दिल्यास अर्जदार सदरचे वाहन आवश्यकता असल्यास तपासकामी हजर करणार नाही तसेच सदरचे वाहन हे महत्वाचा पुरावा असुन आरोपी सदर वाहनाची विल्हेवाट लावुन पुरावा नष्ठ करु शकतो तसेच वाहनाच्या वर्णनामध्ये बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच गुन्हयाचा तपास प्राथमीक टप्प्यात असल्याने सदरचे वाहन सुपूर्ततनाम्यावर देण्यास हरकत नोंदविली. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी जप्त वाहन अर्जदारास सुपूर्तनाम्यावर देण्यास प्रखर विरोध केलेला आहे

३) सदर प्रकरणातील आरोपी याने नि.क्र. ७ खाली पुरसीस दाखल करुन अर्जदार त्याचे वडिल असुन सदरचे वाहन अर्जदार यांना देण्यास हरकत नसल्याबाबत कथन केले आहे. अर्जदाराच्या व्यतिरीक्त इतर कोणीही वाहनासाठी अर्ज केलेला नाही. अर्जदार हे सदर वाहनाचे मालक आहेत. सदर जप्त वाहन पोलीस ठाण्यात तसेच पडून राहील्यास सदर वाहनाचे नुकसान होवू शकते. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **सुंदरभाई देसाई -वि- गुजरात राज्य**, २००२ Supp (3) SCR, 39 या निर्णयविधीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार मी अटी व शर्तीवर खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, खामगाव ग्रामीण यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी अपराध क्रमांक ७३/२०२६ मध्ये जप्त बजाज कंपनीची पल्सर २२० डी.टी.एस. वाहन

ज्याचा नोंदणी क्र. एम.एच २८ सी.ई. ९३७३ चेचीस नं. MD2A13EX7TCL75650 इंजीन क्रमांक DKXCTL28730 अर्जदार परमेश्वर सोनाजी विरशीद यांना, रु १,००,०००/- च्या (अक्षरी रुपये एक लाख मात्र) सुपूर्तनामा बॉण्डवर, ताबडतोब दयावे.

३. तपास अधिकरी यांनी अर्जदाराच्या खर्चाने सदरहू वाहनाचे फोटो काढून त्याचा रितसर पंचनामा करुन ते दोषारोपपत्रासोबत जोडावे.

४. साक्षी पुराव्याचे वेळी आवश्यकता वाटल्यास अर्जदाराला सदरहू वाहन न्ययालयासमक्ष हजर करावे लागेल.

५. अर्जदाराने प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत सदरहू वाहनामध्ये कोणत्याही प्रकारचे फेरबदल करु नये किंवा वाहनाची विल्हेवाट लावू नये.

NISHANT DNYANESHWARRAO GOLE

Digitally signed by NISHANT DNYANESHWARRAO GOLE
Date: 2026.03.23 11:10:19 +0530

दिनांक :- २०-०३-२०२६

( एन. डी. गोळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट क्र. २ खामगांव.

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः- के. एस. देशमुख, लघुलेखक ग्रेड-३.

न्यायालयाचे नांवः- न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, खामगांव.

दिनांकः-२०.०३.२०२६